**IJ12ABJ**

**TIME : 2 hrs.** **MARKS : 50**

**प्र. १ला. खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा.** (२०)

अ) 'नागर जीवनातील सुखदु:खाचे दर्शन घडविण्यात 'कथाविविधा' मधील कथालेखक यशस्वी झाले आहेत.' साधकबाधक चर्चा करा.

ब) आपल्याच देशात निर्वासिताप्रमाणे जीवन जगणाऱ्या दलित, आदिवासी, कातकरी समाजाचे दु:ख 'कथाविविधा' मधील कथांमधून कसे प्रगट झाले आहे ते साधार लिहा.

क) 'वणव्यात होरपळणाऱ्या झाडा-झुडपासारखी ग्रामीण भागातील माणसांची अवस्था झालेली आहे.' या विधानाचा तुम्ही अभ्यासलेल्या कथांच्या आधारे परामर्श घ्या.

ड) 'स्त्रीचे माणूस म्हणून जगणेच नाकारणाऱ्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेवर 'कथाविविधा' मधील लेखिका प्रहार करतांना दिसतात. सोदाहरण विशद करा.

**प्र. २रा. खालीलपैकी कोणत्याही दोन टीपा लिहा.** (१०)

अ) 'दुसरा आइनस्टाइन' मधील डॉ. श्रीनिवासन

ब) 'चिरोटी' मधील भाऊबंदकी

क) 'महा देश कंचा?' मधील कातकरी समाजाचे दु:ख

ड) 'येळकोट' कथेचा शेवट

**प्र.३रा अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर ६० ते ८० शब्दात वर्तमानपत्रासाठी बातमी तयार करा.** (४)

१) ठाण्यातील रेल्वे अपघातात दोन ठार तर चार जण जखमी झाले आहेत. वृत्त तयार करा.

किंवा

२) 'दिल्ली येथे झालेल्या एक दिवसीय क्रिकेट सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला.' वृत्त तयार करा.

**ब) खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर लिहा.** (४)

Freedom is the greatest gift. God can give a nation, but freedom is a strange gift. If we do not wish to lose freedom, we should show our love for it. This love we must show both in words and deeds. It is not enough to say, I am an Indian and I am proud of it. We must ask ourselves, ' Is our Motherland proud of us? Love is shown in sacrifice. Are we ready to die for our country?'

**क) खालील विषयावर ४० ते ५० शब्दात कार्यालयीन टिप्पणी लिहा.** (४)

...पालिकेतील कर्मचारी सौ. वैशाली जोशी यांना त्यांच्या उजव्या

वर्षे सौ. जोशी ठाणे महापालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी आहेत. त्याची ६० दिवसांची भरपगारी रजा शिल्लक आहे. या माहितीच्या आधारे कार्यालयीन टिप्पणी लिहा.

**प्र. ४था खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर २०० ते २५० शब्दात निबंध लिहा.** (८)

१) मराठी भाषेचे भवितव्य

२) महागाईचा भस्मासूर

३) विज्ञान आणि मानव

*******